# जागतिक सायकल दिनानिमित्त मुंबईत रॅली



मुंबई : जागतिक सायकल दिनानिमित्त मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने सोमवारी मुंबईत सायकल रॅली काढली. या रॅलीतून मुंबईकरांना प्रदूषणमुक्त मुंबईचा संदेश देण्यात आला. विधानभवन मेट्रो स्थानक, मंत्रालयापासून मार्गक्रमण केलेल्या रॅलीची आझाद मैदान येथे सांगता झाली. भविष्यात मुंबई मेट्रोचे जाळे विस्तारल्याने प्रदूषणाला आळा बसणार आहे. इंधनाचा कमी वापर करत वाहतूक, सुरक्षितता आणि प्रदूषणमुक्त प्रवास हेच या रॅलीचे मुख्य उद्दिष्ट होते. एमएमआरसीचे कार्यकारी संचालक आर. रमणा यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली आयोजित करण्यात आली. मुं.मे.रे.कॉच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला.